भारतीय गैर न्यायिक

भारत

पचास रुपये

रु.50

FIFTY RUPEES

Rs.50

सत्यमेव जयते

INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

D 574145

अनु. क्र. ४२४२ दिनांक २०/११/०४ रुपये ५०x२=१००/-
नांव राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र पुणे
पत्ता पुणे
हस्त ॲड. कुंभार आर. सी.

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे
25 OCT 2004

उपकोषागार अधिकारी
कोषागार, पुणे करिता

सौ. वैशाली हिंगमीरे
सौ. वैशाली राम हिंगमीरे
ला. नं. हवेली १/७२/९८
भोसरी, पुणे-३९.

## करारनामा

आज दि. २ माहे डिसेंबर सन २००५ रोजी वार शुक्रवार ते दिवशी करारनामा करणेत येतो की येणेप्रमाणे :

पिंपरी - चिंचवड महानगरपालिके तर्फे
श्री. दिलीप गावडे
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११ ०१८.

लिहून घेणार

यांसी
राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र पुणे तर्फे
श्रीयुत निरंजन केळशीकर
सचिव,
१४, रिव्हर व्ह्यू अपार्टमेंट
पुणे नगर रोड, पुणे - ६.

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

लिहून देणार

पुणे पोट तुकडी हवेली, गाव भोसरी, येथील शिक्षण संकुलाची इमारत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वतःच्या मालकिची असून एकूण क्षेत्रफळ चौरस मी. २९०२.६०

चतुःसिमा :

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | मोकळी जागा, पुणे नाशिक महामार्ग |
| पश्चिमेस | : | मोकळी जागा, खेळाचे मेदान |
| दक्षिणेस | : | मोकळी जागा |
| उत्तरेस | : | मोळकी जागा |

हि मिळकत महापलिकेने मनपाचे उपसंचालक नगररचना निर्धरीत करतील त्या भाडेदराने राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र या संस्थेस शैक्षणिक उपक्रमाकरिता दिलेली आहे. तथापि मनपाने आकारलेले भाडे अवाजवी असल्याने सार्वजनिक बांधकाम खाते निर्धारित करतील त्या दराने भाडे अकारणेस संस्थेने विनंती केलेनुसार सार्वजनिक बांधकाम खात्याकडून भाडे निर्धारित करून घेण्यात आले असता सार्वजनिक बांधकाम खात्याने सदर जागेकरिता मासिक भाडे रू. १०३८७५/- (मनपा करा व्यतिरिक्त) निर्धारित केले असून त्या भाडेदराने ताबा दिनांकापासून भाडे घेणेस मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ११०२५ दि. ३०/८/२००५ अन्वये मान्यता दिली असलेने नविन भाडेदरानुसार मूळ करारातील अटी व शर्तीअधिन राहून करारनामा करणेत येतो की

१. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये स्थापन झाली असून लिहून देणार हे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांनी लिहून घेणार संस्थेतर्फे करार स्विकृतीचे व मान्यतेचे सर्व अधिकार हे आदेश क्रमांक प्रशा/१/कावि/~~२९२~~/~~९२~~ दि. ~~१८.०४.१९९२~~ अन्वयेप्रदान केलेल आहेत.

२. लिहून देणार यांना सदर करी करण्येचे अधिकार प्रदान केले असलेबाबत राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र यांचे कडिल पत्र क्र. – दि. – / – / –चे अनवये म.न.पा. कळविले आहे. यावरून ते सदर करारनामा करण्यासाठी त्या संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी असल्याने लिहून देणार यांना सदर करारनामा करण्याचा अधिकार आहे.

३. वर नमूद केलेल्या मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ २९०२.६० चौरस मिटर मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १५५२ दि. २६/११/२००२ अन्वये भाडयाने देणेसंबंधी निर्णय झाले वरून सदर करारनामा पिंपरी

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

भारतीय गैर न्यायिक

भारत

पचास रुपये

रु.50

FIFTY RUPEES

Rs.50

सत्यमेव जयते

INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

D 574146

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

अनु. क्र. ४२४२ दिनांक २५/१०/०५ रुपये ५०x२=१००/-

नांव राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पुणे

पत्ता पुणे

हस्ते ॲड. कुंभार आर. सी.

R.Kumbhar.

सौ. वैशाली हिंगमिरे

सौ. वैशाली राम हिंगमीरे

ला. न. हवको ५/७२/९८

भोसरी, पुणे-३९.

25 OCT 2005

उपकोषागार अधिकारी कोषागार, पुणे

चिंचवड महानगरपालिका व राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र यांच्यात करण्यात येत आहे. या कराराच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.

१. राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र या संस्थेस इंद्रायणीनगर, भोसरी येथील शिक्षण संकुलाची इमारत, एकुण क्षेत्रफळ २९०२.६० चौ.मी. खालील अटी शर्ती नुसार भाडे कराराने देण्याचे मान्य केले आहे. लिहून देणार यांनी अनामत भाडयापोटी र. रू. — पा.क्र. — दि. — अन्वये बिनव्याजी मनपाकडे जमा केलेले आहेत.

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

२. सदर कराराची मुदत ताबा दिनांकापासून ३० वर्षाचे कालावधीसाठी असून तदूनंतर लिहून देणार यांनी दुसऱ्या जागेची व्यवस्था करावयाची आहे. हे लिहून देणार यांनी मान्य केले आहे.

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

३. करारनाम्यात वर्णन केलेली जागा ही राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र या संस्थेस कॉलेज, इस्टिटयुट, मॅनेजमेंट, फार्मसी अशा व तत्सम शैक्षणिक कारणासाठी दिलेली असल्याने त्यांना सदर जागेचा वापर हा त्याच कारणासाठी करणे बंधनकारक आहे. अन्य कारणासाठी जागेचा वापर करता येणार नाही. तसे लिहून देणार यांनी मान्य केले आहे. अन्य कारणासाठी जागेचा वापर केल्याचे आढळल्यास सदरचा करारनामा रदूद करून जागा ताब्यात घेतली जाईल. असे लिहून देणार यांनी मान्य केलेले आहे.

४. सदर राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र संस्थेस सदर जागा स्वतः च्या वापरासाठी दिलेली असल्याने सदर जागा किंवा जागेचा काही भाग त्यांना कोणत्याही व्यक्तिस किंवा संस्थेस हस्तांतरीत करता येणार नाही किंवा भाडयाने देता येणार नाही. हे लिहून देणार यांनी मान्य केले आहे. तसेच इमारत संरचनेत परस्पर बदल करता येणार नाही.

५. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर इमारतीकरिता मासिक भाडे रक्कम रू. १,०३,८७५/- (मनपा कराव्यतिरिक्त) पत्र क्र. रेशा/वा.भाडे/प्रमाणपत्र/८५२०/०५ दि. ४/७/०५ अन्वये निश्चित करून दिलेले आहे. लिहून देणार यांनी सदर दरानुसार भाडे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी भरावे. जागा भाडे आकारणी करताना महिना १ ते ३१ असा राहिल.

मा. स्थायी समिती ठराव क्र ११०२५ दि. ३०/८/२००५ अन्वये ताबा दिनांकापासून सार्व. बांधकाम विभागाने निश्चित केलेला भाडेदराने वसुली करणेस मान्यता दिलेली आहे.

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

६. आवश्यकता वाटल्यास सदर जागेच्या भाडयात वाढ करण्याचे अधिकार म.न.पा.ने राखून ठेवले आहेत. तसेच म.न.पा. चे उपसंचालक, नगररचना हे ठरवतील त्यानुसार जागा भाडे वाढवून देण्यास लिहून देणार यांनी मान्यता दिली आहे.

७. लिहून देणार यांनी भाडयाने घेतलेल्या इमारतीचे सर्व प्रकारचे संबंधित कर स्वतः परस्पर भरण्याचे मान्य केलेले आहे. असे कर त्यांनी वेळच्या वेळी भरून ते भरले बाबत आवश्यक त्या पावत्या म.न.पा. प्रभाग कार्यालयास सादर करावयाच्या आहेत. त्याचा जागा भाडे रक्कमेशी काहीही संबंध नाही. कर भरल्याच्या पावत्या प्रत्येक महिन्याच्या महिन्यास सादर करावयाच्या आहे. तसेच जागेची रंगरंगोटी व किरकोळ दुरूस्ती स्वखर्चाने करून घेण्याचे लिहून देणार यांनी मान्य केलेले आहे.

८. लिहून देणार यांनी सलग ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधींचे भाडे न भरल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता कराराचा भंग झाला असे समजून करार रदूद करून सदर जागा ताब्यात घेण्याचा अधिकार म.न.

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

पा. स राहिल हे लिहून देणार यांनी मान्य केले आहे.

९. सदर जागेची म.न.पा. स आवश्यकता वाटल्यास महानगरपालिका १ (एक) महिन्याची पूर्व नोटीस देवून केलेला करार रद्द करून जागा ताब्यात घेण्याचा अधिकार म.न.पा. ने राखून ठेवला आहे.

१०. लिहून देणार यांना सदर जागेची आवश्यकता नसल्यास त्यांनी जागा सोडणेपूर्वी १ महिन्याची नोटीस देणे आवश्यक आहे. नोटिस सोबत त्यावेळी देय असलेले सर्व कर व सर्व बिले त्यांनी चुकती केल्याच्या पावत्या सादर करणे आवश्यक आहे. १ महिन्यापूर्वी नोटिस न दिल्यास एक महिन्याचे आगाऊ भाडे देण्याचे लिहून देणार यांनी मान्य केलेले आहे.

११. जागेचा ताबा कोणत्याही दिनांकास दिलेला असला तरी त्या महिन्याचे संपूर्ण भाडे भरण्याचे लिहून देणार यांनी मान्य केलेल आहे. तसेच ताबा सोडताना कोणत्याही दिनांकास सोडला तरी त्या महिन्याचे संपूर्ण भाडे भरण्याचे लिहून देणार यांनी मान्य केले आहे.

१२. महानगरपालिका सभा ठराव तसेच केलेला पत्रव्यवहार हा या कराराचा अविभाज्य भाग आहे. तसेच करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्ती मध्ये बदल करणेच्या एकतर्फी अधिकार मा. आयुक्त यांना राहिल.

१३. सदर करारनामा मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ च्या तरतुदीस अधीन असून कराराच्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास उक्त कायदयातील तरतुदींप्रमाणे करावाई करण्यात येईल.

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

१४. लिहून देणार यांना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून स्वखर्चाने मीटर बसवून घेवून वीज कनेक्शन घेण्याची जबाबदारी राहिल. त्या प्रित्यर्थ येणारा खर्च (वीज वापरासह) स्वतः करावा लागेल.

१५. प्रस्तुतच्या भाडेपट्टयामध्ये कोणत्याही अटींचा भंग केल्यास मुदतीचा भाडेपट्टा रद्द करून प्रस्तुत भाडेपट्टा संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनाच राहिल व या कामी सदर संस्थेची कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. सदर करारनाम्यातील कोणत्याही अटींचा भंग झाल्यास करारनामा रद्द करण्याचा अधिकार लिहून घेणार यांना राहतील.

For N. C. R. D.

( Authorised Signatory )

येणेप्रमाणे करारनामा आज दि. 02/12/2005 रोजी साक्षीदारांच्या समक्ष सहया करण्यात आल्या आहेत.

For N. C. R. D.

(Authorised Signatory)

साक्षीदार

१. नाव : जोहरे बेहू वानेरकर

पत्ता : गृहलक्ष्मी हाउसिंग सो., आकुर्डी

सही :

लिहून देणार

श्री निरंजन शं. केळशीकर

सचिव

राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पुणे

२. नाव : प्रकाश नामदेव काराळे

पत्ता : मसायवान कॉलनी, आकुर्डी

सही :

लिहून घेणार

श्री. दिलीप गावडे

अतिरिक्त आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे - ४११ ०१८.

सहाय्यक आयुक्त
भूमि आणि जिंदगी
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

प्रतिनिधी -
१/१२/२००५
(प्रकाश नामदेव काराळे)

पावती क्रमांक ७१६०४९ दि. २१.९.२००६ अन्वये रुपये ६,२३,२५०/- अनामत रक्कम व पावती क्र. ७१६०५० दिनांक २१/९/२००६ अन्वये भाडे रक्कम रुपये ११,४३,२६५/- कार्यालयाकडे जमा केले आहे.